साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. १९ मे २०२५ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## बीड जिल्ह्याचे पालकमंत्री झाल्यानंतर अजितदादा सोमवारी प्रथमच परळीत

बीड (बातमीदार):- बीड जिल्ह्याचे पालकमंत्री झाल्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार सोमवारी (दि.१९) प्रथमच परळी, अंबाजोगाईच्या दौऱ्यावर येत आहेत.

श्री पवार सकाळी ८:०५ वाजता येथील शक्तीकुंज वसाहत मैदानावरील हेलीपॅड वर आगमन नंतर मोटारीने येथील वैद्यनाथ मंदिरात जावून ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेणार आहेत. यावेळी मंदिर परिसरात सुरू असलेल्या विकासकामांची पाहणीही श्री पवार करणार आहेत. त्यानंतर सकाळी ९:०० वाजता शासकीय विश्रामगृहावर वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत तीर्थक्षेत्र विकास कामाचा व वीज केंद्रातील कामाचा आढावा तसेच इतर विकास प्रश्नांचा ते आढावा घेणार आहेत. यावेळी माजीमंत्री आ.धनंजय मुंडे, पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्यासह जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस प्रमुख, इतर मान्यवर यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

दोन दिवसापूर्वी परळीत झालेल्या शिवराज दिवटे याला झालेल्या मारहाणीच्या पार्श्वभूमीवर श्री पवार परळीत येत आहेत. सोमवारी



विविध कार्यकर्त्यांनी शहर बंदचे आवाहन केले आहे. या घटनेचे पडसाद जिल्हाभरात उमटले आहेत. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा आढावाही श्री पवार घेतील अशी माहिती सुत्रांनी दिली. परळीतील आढावा बैठकीनंतर श्री पवार अंबाजोगाईकडे रवाना होणार आहेत.

दरम्यान, सकाळी १०.३० वाजता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई, जिल्हा बीड येथे आगमन. सकाळी १०.३० वाजता सादरीकरण. नंतर बाह्य विभागाची नूतनीकृत इमारत तसेच मुलांच्या वस्तीगृहाच्या नूतनीकृत इमारतीची पाहणी. नंतर स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय बी-बिल्डींग सर्जिकल वार्ड व नूतन मॉड्युलर ऑपरेशन थिएटरचे लोकार्पण. नंतर मोटारीने प्रयाण. ***

## सोमवारी परळी बंद

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी तालुक्यातील लिंबूटा येथील युवक शिवराज नारायण दिवटे याला झालेल्या अमानुष मारहाणीच्या निषेधार्थ सोमवारी (दि.१९) परळी बंदचे आवाहन करण्यात आले आहे.

विविध स्तरातील कार्यकर्त्यांनी शनिवारी (दि.१७) येथील पोलिसांना दिलेल्या निवेदनात ही माहिती दिली आहे. या निवेदनात पुढे म्हटले आहे की, शिवराज दिवटे याला मारहाण करणाऱ्या आरोपींना मोकाका लावावा, परळीतील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालावा, आरोपींची शहरातून धिंड काढण्यात यावी आदी मागण्या या निवेदनात करण्यात आल्या आहेत. दरम्यान, सोमवारी आयोजित करण्यात आलेल्या परळी बंदला परळीतील व्यापारी, नागरिकांनी पाठींबा देवून सहभागी व्हावे असे आवाहन कार्यकर्ते, नागरिकांनी केले आहे. **

## आ.मुंडेंनी घेतली शिवराज दिवटेची भेट; आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी



अंबाजोगाई (प्रतिनिधी):- दोन दिवसांपूर्वी परळी परिसरात मारहाण झालेल्या शिवराज दिवटे या तरुणाची अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात जाऊन माजीमंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी रविवारी(दि.१८) भेट घेतली.

शिवराज सह संदिपान दिवटे व दिवटे कुटुंब हे माझ्या घरातील असल्यासारखे आहेत, शिवराजला मारहाण केलेल्या संपूर्ण ठोळक्यावर कठोरात कठोर कारवाई करावी अशी मागणी यावेळी धनंजय मुंडे यांनी केली असून बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी यासंदर्भात ठोस भूमिका घेतली आहे पुढे तपासांती सर्व गोष्टी स्पष्ट होतील. तसेच या प्रकरणात कुठेही जाती धर्माचा काहीही संबंध येत नाही असे स्वतः एसपींनी देखील स्पष्ट केले असल्याचे धनंजय मुंडे यावेळी माध्यमांशी बोलताना म्हणाले.

आपण शिवराज व दिवटे कुटुंबीयांच्या पाठीशी आहोत, पोलीस योग्य तो तपास करतील आणि आरोपींना कठोर शिक्षा मिळेल, असा विश्वास असल्याचे धनंजय मुंडे यावेळी म्हणाले. यावेळी माजी आ.संजय दौंड, ज्येष्ठ नेते राजकिशोर मोदी, रा.कॉं.चे तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे, विश्वंभर फड, भागवत तावरे यांसह आदी उपस्थित होते. **

## शिवराज दिवटे यास मारहाण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा

### खा.सोनवणे, श्री जरांगे, श्री धस यांची मागणी

बीड, (बातमीदार):- परळी तालुक्यातील लिंबुटा येथील शिवराज दिवटे या युवकाला परळी परिसरात अमानुष मारहाण करण्यात आली होती. त्याच्यावर सध्या अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचार सुरू आहेत. रविवारी (दि. १८) सकाळी खा.बजरंग सोनवणे, मराठा योद्धे मनोज जरांगे पाटील, आ.सुरेश धस यांनी दिवटे याची भेट घेत या प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाईची मागणी केली.

परळी तालुक्यातील जलालपूर येथील अखंड हरिनाम सप्ताहात काही लोकांचा वाद झाला होता. त्यावेळी शिवराज दिवटे हा त्या ठिकाणी उपस्थित होता. त्याचा राग मनात धरून परिसरातील काही तरुणांनी दिवटे याला अमानुष मारहाण केली. या प्रकरणात पोलिसांनी सात जणांना अटक केली आहे. यातील दोन जण अल्पवयीन असल्याने त्यांची रवानगी निरीक्षणगृहात करण्यात आली. तर उर्वरित पाच जणांना २० मे पर्यंतची पोलिस कोठडी सुनावली. दरम्यान, या प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई करावी, उर्वरित आरोपींनाही तात्काळ अटक करावी, अशी मागणी आता केली जात आहे. जिल्ह्यात मारहाणीचे प्रकार घडत आहेत. अशा प्रकरणात कठोर कारवाई केली जावी आणि अशा पद्धतीने कारवाईकरिता एक विशेष अधिकारी नियुक्त करावा, अशी मागणी खा. बजरंग सोनवणे यांनी केली. तसेच या प्रश्नावर आपण मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना भेटणार असल्याचे ते म्हणाले.

दरम्यान, गुंडांच्या टोळीचा नायनाट आम्हाला करावा लागेल. मी आता हे प्रकरण गांभीर्याने घेतले आहे. सरकार या टोळीला संपवत नाही, त्यामुळे आता आम्हाला सोसावे लागत आहे. आता बोलायचे कमी आणि करून दाखवाचे असा इशारा श्री मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

दरम्यान, शिवराज दिवटे याला अतिशय चुकीच्या पद्धतीने मारहाण झाली. सप्ताहामध्ये जेवण्यासाठी गेलेल्या शिवराजला टोळक्याने केलेली मारहाण गंभीर प्रकार आहे. अशा पद्धतीने मारहाण करत व्हिडिओ व्हायरल करणाऱ्या गुंडांची धिंड काढली पाहिजे, अशी मागणी भाजपा आमदार सुरेश धस यांनी केली. ***

## शहरात निघालेल्या तिरंगा रॅलीला परळीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

परळी वैजनाथ, (बातमीदार):- भारतीय सैन्य दलाने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानला मात देत दाखवलेल्या अतुलनीय शौर्याला सलाम करण्यासाठी परळी येथे पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे व मा. खासदार प्रीतम ताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.देशभक्तीच्या जयघोषात परळीकरांनी या रॅलीत उस्फुर्तपणे सहभाग नोंदवला.मोंढा मैदान येथे पाच माजी सैनिकांचा सन्मान, शहीदांना श्रद्धांजली व राष्ट्रगीताने तिरंगा रॅलीचा समारोप झाला.

जम्मू-कश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय सैन्याने 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत पाकिस्तान आणि पीओकेमधील दहशतवादी तळांवर अचूक हल्ले करत १०० हून अधिक दहशतवाद्यांचा खात्मा केला. या अभूतपूर्व कारवाईने भारतीय




सैन्याने देशाचे मान उंचावली असून, या शौर्याला सलाम करण्यासाठी देशभरात तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात येत आहे. दि. १५ मे रोजी दुपारी ४.१५ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून भाजपा तालुकाध्यक्ष राजेश गित्ते,निर्मळ,शहराध्यक्षा सौ.उमाताई समशेट्टे यांच्या नेतृत्वाखाली तिरंगा रॅलीस सुरुवात झाली. भारतीय सैन्याच्या समर्थनार्थ घोषणा देत ही रॅली एकमिनार चौक,स्टेशन रोड,भवानी नगर,रोडे चौक,राणी लक्ष्मीबाई टॉवर मार्गे आल्यानंतर मोंढा मार्केट येथे माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला.शहीदांना श्रध्दांजली अर्पण करत समारोप करण्यात आला.या रॅलीत भाजपा तालुकाध्यक्ष राजेश गित्ते व वसंत निर्मळ, परळी शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे यांच्यासह जेष्ठ नेते दत्ताप्पा ईटके, विकासराव डूबे,जुगलकिशोर लोहिया, रमेशराव कराड, सतीश मुंडे, संदीप लाहोटी, शांतीलाल जैन, अनिल तांदळे, महेश्वर निर्मळे, प्रकाश जोशी, दत्ता कुलकर्णी, डॉ शालिनीताई कराड,शीराम मुंडे, रवी कांदे, मारोतराव फड, सुग्रीव ( बापू) मुंडे , गणपतप्पा सौन्दळे, प्रा बिभीषण फड, राजेंद्र ओझा, महादेव ईटके, उमेश खाडे, अरुण पाठक, नितीन समशेट्टे, अनिष अग्रवाल, संजय मुंडे, नितीन ढाकणे बाळासाहेब चव्हाण, बाळासाहेब फड, सुंदर मुंडे, वैजनाथ रेकणे, बंडूनाना कोरे, योगेश पांडकर, विजयकुमार खोसे, पवन मोदाणी, रमेश गायकवाड, सुशील हरंगूळे, नरेश पिंपळे,अमोल डुबे, प्रभावती शेटे, चंदाताई ठोंबरे, सारिका कुरील, सरला उपाधाय, चित्राताई देशपांडे,पवन तोडकरी, दिलीप नेहरकर, शीपाद शिंदे, अच्युत जोगदंडसर, उमेश निळे, शेख शमी, राहुल घोबळे, शेख खदिर, योगेश मुंडे, दिनेश आंधळे,माणिक कराड,माऊली आंधळे, भाऊसाहेब गित्ते, अनिल गुट्टे, धुराजी साबळे, दशरथ गुट्टे, जनार्दन मुंडे, राजाभाऊ मुंडे, गोपाळ केंद्रे, केशव गित्ते, तुकाराम गित्ते ,संतोष राठोड, राजाभाऊ भांगे, बालाजी गुट्टे,ज्ञानेश्वर मुंडे, चैतन्य मुंडे, धनंजय आंधळे, नारायण गुट्टे , देहू आघाव, रुस्तुम केंद्रे, दत्ता गोल्हेर, सुनील केंद्रे, दत्तू गुट्टे , कांता आबा सोनवणे, सुरेश माने, माऊली साबळे, पिंटू शेठ कोपनर, पेंटर विष्णू रोडगे, सुधाकर पोळ, भुजंग जाधव, संतोष धानोरकर, तुकाराम आचार्य, संतोष सोळंके, बळीराम गडदे, संत रामजी गडदे, लक्ष्मण कावळे, विकास पाळवदे, माणिक कराड, विक्रम मिसाळ, गोविंदरावजी कांदे, विनोद निर्मळ, धीरज चिंचाने, राजेभाऊ सपकाळ, बाबुरावजी कदम, सागर देशमुख, बबन बाप्पा मुठाळ, अनिरुद्ध अंभोरे, हनुमंत नागरगोजे, एकनाथ लांब, बाळासाहेब शिंदे, मधुकर जाधव, दिलीप राठोड, अविनाश देशमुख आदी शेकडो नागरिक सहभागी झाले होते.**

संपादकीय...

# गुणवंतांचे कौतुकच पण 'यांचे' काय?

**✼ सुविचार ✼**
**माणसाला माणसापासून दूर करते ती पहिली गोष्ट आपली 'जीभ' आणि दुसरी म्हणजे 'पैसा' होय!**

गेल्या फेब्रुवारी, मार्च व त्यानंतर घेण्यात आलेल्या दहावी, बारावीसह इतर परीक्षांचे निकाल जाहीर होत आहेत. निकालाच्या बातम्यांनी वर्तमानपत्राचे रकाने भरले जात आहेत. सोशलमिडियावरही या बातम्या झळकत आहेत. सर्वत्र गुणवंतांचे कौतुक व अभिनंदन सुरू आहे. अभिनंदनाच्या जाहिरातींनी वर्तमानपत्राची मोठी जागा व्यापलेली दिसते आहे. शिवाय जागोजागी मोठमोठी डिजीटल बॅनर झळकत आहेत. या साऱ्या गोष्टी ज्यांना जमल्या नाहीत ते वर्तमानपत्रात पॉम्पलेट टाकून गुणवंतांचे कौतुक, अभिनंदन करताना दिसत आहेत. शाळा, महाविद्यालयाबरोबरच कोचिंग क्लासेसवाल्यांचीही सध्या जोरदार जाहिरातबाजी सुरू आहे.

या परीक्षेच्या निकालाचा टक्काही विविध शाळांचा उल्लेखनिय आहे. कित्येक शाळा महाविद्यालयाचे निकाल शंभर टक्के लागले आहेत. यंदा दहावीच्या परीक्षेला बीड जिल्ह्यातून ४१ हजार ९५८ विद्यार्थी बसले होते. त्यातील ४० हजार ७७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्णात २२ हजार २४५ मुले व १६ हजार ८३२ मुली आहेत. मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण २.१५ टक्के जास्त आहे. जिल्ह्याच्या निकालाचे प्रमाण ९६.४७ टक्के आहे. मागची सलग तीन वर्षे जिल्ह्याचा दहावीचा निकाल विभागात अव्वल आहे. यंदाच्या निकालात फक्त एक हजार ४६४ विद्यार्थी नापास झाले आहेत.

बारावीच्या परीक्षेतही बीड जिल्हा विभागात पहिला आहे. या परीक्षेचा निकाल गेल्या दोन वर्षापासून ९५% वर आहे. बारावीची परीक्षा दिलेल्या ४२ हजार ४१७ विद्यार्थ्यांपैकी ४० हजार ३१० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. जिल्ह्यात नापासांची संख्या सुमारे २१०० आहे.

कॉपीमुक्त अभियानामुळे दरवर्षीच्या तुलनेत यंदा दहावीचा विभागाचा निकाल २.३७ टक्के कमी झाला आहे तर नऊ शाळांचा निकाल शून्य टक्के आहे. राज्यात दहावीत १०० टक्के गुण घेणारे पन्नास टक्के विद्यार्थी एकट्या लातूरचे आहेत. राज्यात २११ विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत १०० टक्के गुण घेतले आहेत. त्यात लातूरचे ११३ विद्यार्थी आहेत हे विशेष.

दहावी, बारावीच्या परीक्षेत कॉप्या, इतर गैरप्रकार रोखण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जातात. यंदा तर परीक्षा केंद्रावरील शाळेतील शिक्षक इतर ठिकाणी पाठवले होते. असे होऊनही परीक्षेतील कॉपीला व इतर गैरप्रकाराला फारसा आळा बसला नाही.

एकेकाळी बोर्डाच्या परीक्षेत शंभरामागे चार-दोन पास व्हायचे आता शंभरातून चार-दोन नापास होत आहेत. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मिळालेल्या गुणांची टक्केवारीही शंभर टक्केच्या घरात जाऊन बसली आहे. या परीक्षेत रात्रन्‌दिवस अभ्यास करून, प्रामाणिकपणे कष्ट करून यश मिळवलेल्या सर्व गुणवंतांचे, यशवंताचे खूप-खूप अभिनंदन आणि कौतुकही ! पुढील वाटचालीस त्यांना शुभेच्छा. या गुणवंताबरोबरच त्यांना गुणवंत करण्यासाठी धडपडणाऱ्या शाळा, परिश्रम घेणारे शिक्षक, पालक व शिकवणीवाले या सर्वांचेही कौतुक आणि अभिनंदन आम्ही मनापासून करतो, त्यांच्या श्रमाला सॅलूट करतो.

या परीक्षेच्या काळात अनेक शाळा, महाविद्यालयांच्या परीक्षा केंद्रावरील चित्र बघितल तर आज कुणाचे अभिनंदन, कौतुक करावे हा प्रश्न पडतो. कॉप्यांचे ढिगच्या ढिग या केंद्राच्या परिसरात दिसायचे. परीक्षा दालनात हातात उत्तर पत्रिका पडल्या पासून परीक्षेची वेळ संपेपर्यंत कितीतरी विद्यार्थी उत्तरे पाहून लिहिताना दिसतात. सोडवलेल्या उत्तरांच्या कॉप्या झेरॉक्स काढून विद्यार्थ्यांना पुरवल्या जातात. भरारी पथक येणार असल्यास व आल्यास विद्यार्थ्यांना सूचना दिली जाते. त्यामुळे या पथकालाही सारे कसे सुरळीत दिसते. पथकाने पाठ फिरवताच पुन्हा राष्ट्रीय कार्यक्रम सुरू होतो. परीक्षेच्या दालनात कॉपी न करता प्रामाणिक पणे रात्रन्‌दिवस डोळे फोडून अभ्यास केलेले अनेक परीक्षार्थी आपल्या मनाने उत्तर पत्रिका सोडविताना दिसतील, बाकी बहुतेक इमानदारीने कॉप्या करताना दिसतात. दालनावरील अनेक पर्यवेक्षक, विद्यार्थ्यांना पाणी देणारे अनेक सेवक, बंदोबस्ताला असलेले कितीतरी पोलिस व इतर सर्व कॉप्या पुरवणारे खरोखरच शुरवीर असतात. परीक्षेतील प्रश्नपत्रिका सोडऊन घेऊन त्याच्या झेरॉक्स काढून परीक्षा केंद्रावर जाऊन संबंधित दालनातील आपल्या विद्यार्थ्यापर्यंत पुरवण्याचे काम अनेकजण करतात. दालनात कॉपी देणाऱ्याला, ती लिहिणाऱ्याला फारसा विरोध होत नाही. काही परीक्षा केंद्रावर तर विषय शिक्षक विद्यार्थ्यांना परीक्षेत उत्तरे सांगतात! अशी चर्चा मुले करतात. हा सर्व प्रकर पाहून हुशार विद्यार्थी मात्र संतप्त होताना दिसतात.

केंद्राबाहेर कडकपणाचे नाटक चालले असते. परीक्षेचे नियम, कायदे, तत्व, निष्ठा, प्रामाणिकपणा, कर्तव्य या भ्रष्ट यंत्रणेमुळे कोपऱ्यात दडून बसलेली दिसतात. अनेक परीक्षा केंद्रावर कोणत्या दालनावर कोणाला पाठवायचे हे देखील मॅनेज झालेले दिसते. हे चित्र अनेक परीक्षा केंद्रावर परीक्षेच्या काळातील आहे. परीक्षा केंद्रावर चाललेल्या कॉप्या व गैरप्रकाराच्या बातम्याही प्रसिद्ध होतात पण काहीच होत नाही हे विशेष!

या प्रवाहात आपल्याकडील खुप कमी परीक्षा केंद्र व शिक्षक कर्मचारी परीक्षेचे पावित्र्य जपून आहेत. परळीच्या बाजूलाच असलेल्या अंबाजोगाई येथील अनेक परीक्षा केंद्रावर कॉपी चालत नाही. त्यामुळे अंबाजोगाईची गुणवत्ता टिकून आहे. अशा वातावरणात झालेल्या परीक्षांचे निकाल लागत आहेत. तेंव्हा प्रश्न पडतो अभिनंदन, कौतुक कुणाचे? कॉपी करून यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांचे, ती पुरवणाऱ्या शुरवीरांचे, लिहू देणाऱ्याचे या सर्व भ्रष्ट यंत्रणेचे? खरच प्रामाणिकपणे अभ्यास करून इमानदारीने उत्तर पत्रिका सोडवणाऱ्या विद्यार्थ्याचे !

दरम्यान, दहावी, बारावी व इतर परीक्षेवर शाळा, महाविद्यालयांचे तेथील शिक्षकांचे भवितव्य अवलंबून असते. त्यामुळे परीक्षेत विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उत्तीर्ण व्हावेत म्हणून अनेकजण या गैरप्रकाराचा अवलंब करतात असे काहींचे मत आहे. परंतु हे सर्व गैरप्रकार थांबले पाहिजेत हीच प्रामाणिक अपेक्षा शिक्षणप्रेमींची आहे. ✱✱✱

# वीज आणि तिचं कोसळणं...

आपत्तीचा पावसाळा
लेख-१ (वीज)

नेमेची येतो पावसाळा.. अशी एक उक्ती आहे. मात्र ग्रीष्मात तापलेल्या मातीला आणि होरपळलेल्या वनसंपत्तीसह प्रत्येक सजीवाला याची आस असते आणि असा हा पावसाळा आता उंबरठ्यापर्यंत आलाय. आपण मौसमी हवामानाच्या प्रदेशात राहतो आणि शेतीचा आपला प्रमुख व्यवसाय देखील या पावसावरच अवलंबून असतो तथापि पाऊस जसा दिलासा घेऊन येतो.. चराचरात नवचैतन्य भरतो तसा तो आपत्ती देखील आणतो त्याही पद्धतीने आपण सज्ज व्हायला लागेल.

पाऊस आणि आपत्ती याचांही नातं आहे. ज्याला आपण आपत्ती म्हणतो अशा त्या नैसर्गिक आपत्तीबाबत आपण माहिती घेण आणि त्यापासून किमान प्राणहानी होणार नाही याची खबरदारी घेणं आवश्यक आहे.

पाऊस येतो तो मृग नक्षत्रापासून परंतु त्याची चाहूल आपल्याला रोहिणी नक्षत्रात लागते कारण हा मान्सून पूर्व पावसाचा काळ असतो या काळात वातावरण तापलेले असल्याने वादळी वारे, विजांचा कडकडाट यासह कोसळणे आदी आपत्ती समोर येतात. आपण यासाठी तयार नसल्यास याचा फटका जरूर बसतो.

वीज आकाशात तयार होणं आणि ती जमीनीवर पडणं या मागचं विज्ञान आपण बघूयात,आपण सर्व जण बॅटरी वापरतो तशा नैसर्गिक बॅटरीचा प्रकार आकाशात निर्माण होत असतो. जमीन तापते त्यावेळी जमिनीवरील गरम हवा वरच्या दिशेने जायला सुरुवात होते आणि तिचा आकाशातील ढगांची संपर्क होतो.

आकाशात असलेल्या ढगांमध्ये बर्फाचे कण असतात ते यावेळी (+) धन प्रभारीत असतात तर जाणाऱ्या हवेतील कणांमध्ये (-) ऋण प्रभार असतो या संपर्कातून प्रचंड अशा क्षमतेची ऊर्जा निर्माण होते ती म्हणजे वीज होय.



याचा आणखी एक प्रभार आकाशातच असतो. आधिक उंचीचे ढग असतील तर त्या ढगाच्या वरील बाजूस (+) धन प्रभार आणि खालील बाजूस (-) ऋण प्रभार अशी स्थिती असते. वाऱ्यामुळे हे ढग एकमेकांना धडकतात त्यावेळी या प्रभारामुळे देखील वीज निर्माण होते.

सर्वसाधारणपणे वीज तयार झाल्यावर ती एका ढगातून दुसऱ्या ढगाकडे फेकली जाते अशावेळी प्रचंड आवाज आणि प्रकाश दोन्ही तयार होतो ज्याला आपण ढगांचा कडकडाट आणि विजांचा लखलखाट अर्थात वीज चमकणे असे म्हणतो.

ही वीज ज्यावेळी जमिनीकडे अर्थात ऋण भाराकडे खेचली जाते त्यावेळी ती प्रचंड ऊर्जा आणि गतीने जमिनीकडे झेपावते आणि नजीकच्या प्रथम स्पर्शी उंच टोकावर आढळते याला वीज पडणे असे म्हणतात.

प्रति तास ३ लाख किलोमीटर, म्हणजेच प्रतिसेकंद ८० ते ८५ किलोमीटर गतीने ऊर्जा असणारा हा विजेचा लोळ १५० मीटर अंतरापर्यंत खाली जमिनी जवळ आल्यास नजीकच्या उंच इमारत व इतर वस्तूंवर पडते प्रसंगी याचा प्रवाह १०० कोटी होल्टस् इतका प्रचंड असू शकतो. अशा प्रकारच्या १०० विजा प्रतिसेकंद जमिनीवर पडतात आणि पावसाळ्यात याचे प्रमाण वाढते म्हणून ही नैसर्गिक आपत्ती प्राण घातक ठरते.

**काळजी/ प्रतिबंध हाच उपाय:-**

विज ही प्राणघातक ठरू नये यासाठी काही गोष्टी जरूर करा.

''विजा चमकत असतील तर घराबाहेर जाऊ नका शक्यतो घरातच रहा

''झाडाखाली आश्रय हा सर्वाधिक चुकीचा उपाय आहे. झाडावर वीज कोसळून आपल्याकडे सर्वाधिक मृत्यू होतात. विजा चमकत असतील तर झाडाच्या आसरा घेऊ नका. उंच जागांचा आश्रय देखील टाळा.

''शेतात असाल तर जमिनीवर डोकं टेकवून कानावर हात ठेवून जमिनीशी कमीत कमी संपर्क येईल अशा स्थितीत बसा.

''सध्याच्या वापरातील मोबाईल तसेच घरातील टी.व्ही, रेडिओ आणि वीज उपकरणे यापासून दूर राहा.

''धरणं, तलाव अशा पाणी साठ्यात वीज पडण्याची अधिक शक्यता असते त्यामुळे अशा ठिकाणांपासून दूर राहा.

''जंगलात भटकंती करीत असताना विजा चमकत असतील तर कमी उंचीच्या झाडाचा आसरा घ्या, या स्थितीत वीज पडल्यास उंच झाडावर पडेल व तुमचे प्राण वाचू शकते.

वीज प्राण घातक आहे आणि त्यापासून बचाव सर्वोत्तम उपाय आहे. अद्याप पावसाळा सुरू झालेला नाही तरी १ मार्च ते १५ एप्रिल २०२५ या कालावधी देशात वीज कोसळल्याने १६२ जणांना प्राण गमवावे लागले आहेत.

निसर्गाच्या शक्तीचा आदर केलाच पाहिजे हे देखील स्पष्टच आहे.

**- प्रशांत विजया अनंत दैठणकर**
जिल्हा माहिती अधिकारी, बीड

'परळी परिसर' हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशु प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com
✼ वर्ष ०९ ✼ अंक ०२ ✼ पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. १९ मे २०२५ ✼ किंमत : २ रू.

# दहावीच्या निकालात न्यू हायस्कूल शाळेने निकालाची परंपरा कायम राखली; शाळेचा ९८.४० टक्के निकाल

## ९८.४० टक्के गुण घेऊन पंकज शिंदे शाळेतून पहिला; ३७६ विद्यार्थ्यापैकी ३७० विद्यार्थी उत्तीर्ण



परळी वैजनाथ, (बातमीदार):- येथील उर्जानगर वसाहतीतील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या न्यू हायस्कूल शाळेचा गेल्या मार्च मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल ९८.४० टक्के लागला असून १०९ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यावर गुण घेतले आहेत. त्यात ३५ विद्यार्थ्यांनी ९५ टक्के गुण मिळवले आहेत.

९८.४० टक्के गुण घेवून पंकज विलास शिंदे शाळेतून पहिला आला असून शितल अंगदराव भंडारे व शुभम गोविंद मुंडे, मंथन लक्ष्मीनारायण मंत्री हे विद्यार्थी ९८ टक्के गुण घेवून शाळेतून दुसरे तर श्रुती संभाजीराव सोळंके ९७.८० टक्के घेवून शाळेतून तिसरी आली आहे.

या परीक्षेला शाळेतून ३७६ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ३७० उत्तीर्ण झाले असून चार विद्यार्थी परीक्षेला गैरहजर राहिले होते तर केवळ २ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहे. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी विशेष प्राविण्यासह २८२, प्रथम श्रेणीत ५८, द्वितीय श्रेणीत २६ आणि तृतीय श्रेणीत ४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्ण विद्यार्थ्यांत १७ विद्यार्थ्यांनी संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. न्यू हायस्कूल शाळेचा या परीक्षेचा निकाल ९८.४० टक्के लागला आहे. हा निकाल परळी तालुक्यात मराठी माध्यमाच्या शाळेत उल्लेखनिय आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष आ.प्रकाशदादा सोळंके, सरचिटणीस आ.सतीशभाऊ चव्हाण व सर्व कार्यकारिणीचे संचालक तसेच शालेय समितीचे अध्यक्ष नानासाहेब सोळंके व इतर सर्व सदस्य, मुख्याध्यापक एस.पी.देशमुख, पर्यवेक्षक बालासाहेब राठोड, उच्च माध्यमिक विभागाचे प्रभारी सुनील लोमटे यांच्यासह शाळेतील शिक्षकवृंदांनी केले आहे.

दरम्यान, निकाल लागल्यानंतर मंगळवारी (दि.१३) दुपारी गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा शाळेत पेढे व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. यावेळी शालेय समितीचे ज्येष्ठ सदस्य व माजी नगराध्यक्ष बाळासाहेब देशमुख, दिलीपराव देशमुख, ज्येष्ठ शिक्षक तानाजी शास्त्री, रामकिसन बोंबले, भिमसेन गडदे, डी.एम.शिंदे, कानीफनाथ सोळंके, संजय वानखेडे यांच्यासह विद्यार्थी, पालक, शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते. शाळेतील सर्व शिक्षकांचे परिश्रम, पालकांचे सहकार्य, संस्थेचे पदाधिकारी व संचालक यांचे मार्गदर्शन यामुळेच शाळेच्या निकालाची परंपरा कायम ठेवून आम्ही हे यश मिळवू शकलो असे मुख्याध्यापक एस.पी.देशमुख यांनी सांगितले. ***

# शितल अंगदराव भंडारे हिचे दहावी परीक्षेत ९८% मार्क घेऊन यश



परळी वैजनाथ, (बातमीदार):- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिकशालांत प्रमाणपत्र एस. एस. सी. परीक्षेत परळी वैजनाथ येथील न्यू हायस्कूलची विद्यार्थिनी कु. शितल अंगदराव भंडारे हिने ९८% गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे.

शितलच्या या उल्लेखनीय यशाबद्दल तिचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे ,शितल लहानपणापासून अभ्यासात अत्यंत हुशार असून तिने या यशाचे सर्व श्रेय तिची चिकाटी मेहनत व पालकांचे मार्गदर्शन व शिक्षकांचे मोलाचे योगदान असल्याचे सांगण्यात येत आहे, हायस्कूलचे मुख्याध्यापक व शिक्षकवृंदांनी ह.भ.प.रामेश्वर महाराज कोकाटे अध्यक्ष अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळ महाराष्ट्र राज्य, श्रीनाथ सेवाभावी संस्था अध्यक्ष यशवंतराव चव्हाण यांच्या वतीने शितलचे अभिनंदन करत तिच्या उज्वल भविष्यासाठी रामेश्वर महाराज कोकाटे यांनी कौतुक करुन शुभेच्छा दिल्या.**

# प्रतिकुल परिस्थितीत गुंजन जगताप हिने दहावीत घेतले ९३ टक्के गुण



परळी वैजनाथ, (बातमीदार):- घरची अतिशय प्रतिकूल परिस्थिती असल्याने घर काम करून, तसेच शेतात काम करून कुठलीही शिकवणी नसताना नंदागौळ येथील संत भगवान बाबा विद्यालयाचे विद्यार्थिनी कु .गुंजन गोविंद जगताप हिने नुकत्याच जाहीर झालेल्या एस.एस.सी बोर्ड परीक्षेत ९३.२०%गुण घेऊन उत्तीर्ण झाली आहे.

याबरोबरच गुंजन जगतापने संत भगवान बाबा विद्यालय नंदागौळ या शाळेतून इयत्ता दहावीच्या निकालात दुसरा क्रमांक प्राप्त केला आहे. एका सर्वसामान्य कुटुंबातील कु.गुंजने मिळवलेल्या या यशाबद्दल तिचे शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक यांच्यासह सर्वत्र अभिनंदन होत आहे.कु. गुंजन जगताप ही अंबाजोगाई येथील शिक्षण क्षेत्रातील सर्व परिचित व्यक्तिमत्व बालासाहेब इंगळे यांचे भाची आहे. **

# शाळा बंद पाडणारा संचमान्यतेचा अन्यायकारक निर्णय रद्द करावा-मराठवाडा शिक्षक संघाची मागणी

परळी वैजनाथ, (बातमीदार):-१५ मार्च २०२४ चा संचमान्यतेचा शासनादेशामुळे शाळा बंद पडत असून त्यामुळे गोरगरीबांना शिक्षणाची दारे बंद होणार आहेत. सामान्य माणसाच्या शिक्षणाच्या नरडीला नख लावणारा अन्यायकारक शासनादेश रद्द करावा अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मराठवाडा शिक्षक संघाचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य बंडू अघाव यांनी याबाबत दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे की, राज्याच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने खाजगी अनुदानित शाळेतील संचमान्यतेसाठी १५ मार्च २०२४ रोजी शासनादेश निर्गमित केला आहे. या शासनादेशान्वये संचमान्यता केल्यामुळे अनेक शाळेतील शिक्षकांची पदे कमी झाली आहेत, अनेक शाळेत शून्य पदे झाल्याने अशा शाळा बंद पडणार आहेत परिणामी या शाळेतील विद्यार्थ्यांचे शिक्षण धोक्यात येणार आहे.
सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेच्या नरडीला नख लावणारा, गोरगरीबांना शिक्षणाची दारे बंद करणारा हा जाचक अन्यायकारक शासनादेश असल्याने तो रद्द करावा आणि २८ ऑगस्ट २०१५ च्या शासनादेशानुसार संच निर्धारण करण्यात यावा. अशी मागणी करण्यात आली आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मुंबई उच्च न्यायालयात याचिका क्र ५४५६/२०२५ मधील आदेशानुसार संचमान्यतेची 'जैसे थे' स्थिती ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. न्यायालयीन निर्णयाची त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी. सदरील शासनादेशाप्रमाणे शिक्षकांना अतिरिक्त ठरवण्यात येवू नये. सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेला हानिकारक १५ मार्च २०२४ च्या संचमान्यतेच्या अन्यायकारक शासनादेशामुळे राज्यातील शिक्षण क्षेत्रात प्रचंड असंतोष निर्माण झालेला आहे. त्याची दखल घेऊन तो अन्यायकारक शासनादेश रद्द करण्यात यावा अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव,सरचिटणीस राजकुमार कदम,कोषाध्यक्ष औताडे ए. बी.,केंद्रीय कार्यकारणी सदस्य अशोक मस्कले, बंडू अघाव, जिल्हाध्यक्ष कालीदास धपाटे, सचिव गणेश आजबे, नागनाथ तोंडारे, परवेज देशमुख, विजय गणगे,नामदेव काळे, व्यंकटराव धायगुडे, हनुमंत घाडगे, सानपसर, अनुप कुसूमकर, श्रीधर गुट्टे, संजय गोरे, आलिशान काजी, श्रीहरी दहिफळे, ज्ञानोबा गडदे, बालासाहेब अघाव, राजेश्वर निला,बालासाहेब जाधव, एकनाथ लांडगे,जब्बार खान,दिपक अघाव, बापुराव खोतपाटील आदिनी केले आहे. ***

# परळी-गंगाखेड हायवे रस्त्याच्या पुलाचे काम ३ वर्षांपासून रखडलेलेच!

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी-गंगाखेड राष्ट्रीय महामार्गावरील पुलाचे काम गेल्या ३ वर्षांपासून रखडले असून फक्त ५ फुटांच्या रस्त्याच्या वादांमुळे हे काम रखडले आहे. यावर लवकरात लवकर तोडगा काढण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

परळी-गंगाखेड राष्ट्रीय महामार्गावरील रस्ता रुंदीकरणाचे काम गेल्या चार ते पाच वर्षांपासून सुरू असून संपूर्ण रस्ता पुर्ण झाला आहे मात्र या रस्त्यावरील पुलाचे काम गेल्या तीन वर्षांपासून रखडले आहे. या रस्त्यावरील फक्त पाच फुटांच्या जागेसाठी हे काम रखडले आहे. या रस्त्याच्या जागेचा जमीनमालक प्रदिप तातेड व रेखा फड या दोघांमध्ये जागेचा वाद सूरु असल्याचे महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. या वादामुळे पुलाचे काम रखडले आहे. काम रखडल्याने या रस्त्यावरील प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत असून राजकीय प्रस्थामुळे या वादाकडे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व महामार्गाचे अधिकारी दुर्लक्ष करत आहेत. उपविभागीय अधिकारी व तहसीलदार, महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी यांच्यातील वाद मिटवून पुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे अशी मागणी करण्यात येत आहे. यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते मनोज संकाये यांनी अनेकवेळा महामार्गाच्या अधिकाऱ्यांना निवेदने दिले असून याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे.

तरी हा वाद मिटवून रखडलेल्या पुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करा अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा परिसरातील शेतकऱ्यांनी दिला आहे. ***

## दरवळणारा सुगंध...



*स्वतःच्या मनावर
इतका ताबा
असायला हवा
कि परिस्थिती किती ही
वाईट असली तरी
नेहमी स्वतःबद्दल
आणि इतरांबद्दल
चांगलाच विचार करता
आला पाहिजे.!*

## सगळ व्यर्थ आहे....!




प्रत्येक अस्वस्थ माणसाने थोडं आत डोकावून पाहावं. तिथं त्याला एक अतृप्त जीव येरझारा घालताना सापडेल. माणूस लहान असो, मोठा असो. त्याला जे काही हवं आहे, ते मिळत नसल्याची नांगी सारखी डंख करीत असते. जी काही आपली पात्रता आहे, त्या नुसार आपल्याला जे हवं आहे, ते मिळत नाहीये, हि भावना त्याला छळत असते. हि भावना शांतपणे जगू देत नाही. प्रत्येक छोट्या-मोठ्या औदासीन्या मागे एक सुप्त अहंकार असतो आणि जो पर्यंत हा असा अहंकाराचा जागता पहारा आहे, तोपर्यंत कुणाच्याही आशीर्वादाने कोणती शांती मिळणार? औदासीन्य कमी कसं होणार? अहंकारने मन काठोकाठ भरलेलं असेलं, तर आशीर्वादाने आत उतरायचं कसं? भांड रिकामं हव, तरच ते भरता येईल. कवी शांताराम आठवल्यांनी एका ओळीत ते सांगितलं आहे, ''जो हसला, तो अमृत प्याला'' हे अत्यंत सार्थ आहे. अहंकार संपला रे संपला कि, स्वस्थ आणि आनंदाव्यातिरिक्त उरत काय?आपल्या शांततेच्या आड आपण स्वतःच येतो. हा अडथळा दूर होण महत्वाचं. कबीर ह्यालाच ''सहजयोग'' म्हणतात. हा अहंकार मिटला, तर जीवन प्रतिक्षणी पूज्य भावानं व्यापून जाईल. राहत्या वास्तूत प्रतिदिन गंगास्नान घडेल. तुम्ही जिथं जिथं विहार कराल, ते ते तीर्थस्थळ होईल. अर्थात हि प्रचीती येण्यासाठी मूळ अहंकार गेला नाही, तर प्रार्थना, पूजा, तीर्थयात्रा सगळ व्यर्थ आहे...!

**– संग्राहक : शाहूराज येवते,** परळी वैजनाथ.

## हसरा कोपरा..!



**दहावी, बारावीची परीक्षा देणाऱ्या मुलांना आजकाल ९८.४%, ९९.४%, ९९.६%, १००% मार्क मिळतात. तर एकेकाळी अनेकांना फक्त असा ताप यायचा..!**

# दहावीच्या परीक्षेत विद्यावर्धिनी विद्यालयाचा १०० टक्के निकाल

## १००% गुण घेऊन अथर्व कराड शाळेतून पहिला

परळी वैजनाथ, (बातमीदार):- गेल्या मार्च मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेचा येथील नवीन शक्तीकुंज वसाहतीतील समर्थ शिक्षण प्रसारक मंडळाच्या विद्यावर्धिनी विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला असून शाळेच्या ८८ विद्यार्थ्यांनी ९० टक्यापेक्षा जास्त गुण मिळवले आहेत. त्यात ३० विद्यार्थ्यांनी ९५ टक्के गुण घेतले आहेत.

१०० टक्के गुण घेवून अथर्व जीवन कराड हा विद्यार्थी शाळेतून पहिला आला आहे तर ९८.८० टक्के गुण घेवून श्रावणी संतोष बारड दुसरी तर ९८.६० टक्के गुण घेवून साक्षी शिवराज बडे तिसरी आली आहे. नम्रता ज्ञानेश्वर पोते, सानिया अंकुश पवार, जान्हवी विलास स्वामी हे विद्यार्थी ९८.४० टक्के गुण घेवून शाळेतून चौथे तर आयुष पद्मराज पारखे ९४ टक्के गुण घेवून शाळेतून पाचवा आला आहे. १० विद्यार्थ्यांनी संस्कृत विषयात तर तीन विद्यार्थ्यांनी गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. यशस्वी



विद्यार्थ्यांचे अभिनंदन समर्थ शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष एस.एस.कोळगे, उपाध्यक्ष एस.बी.भिंगोरे, सचिव पी.जी.ईटके यांच्यासह संचालक पी.जे.पैंजणे, एम.टी.मुंडे, व्ही.डी.देशपांडे, आर.पी.वाणी, डॉ.बी.ए.चेवले, एस.एम.कराड, यु.एच.मातेकर, श्री अभंग, मुख्याध्यापक आर.जी.निला, जे.व्ही.सुमठाणे यांच्यासह शाळेतील शिक्षक, कर्मचारीवृंदांनी केले आहे. दरम्यान, निकाल लागल्यानंतर मंगळवारी शाळेत गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे पदाधिकारी श्री इटके, श्री मुंडे, श्री कराड यांच्यासह मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, कर्मचारी उपस्थित होते.**

# ९८% गुण मिळवत अक्षरा महेश बदने हिचे दहावीत घवघवीत यश

परळी वैजनाथ, (बातमीदार):- फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत परळी वैजनाथ येथील फाउंडेशन स्कूल ची विद्यार्थिनी कु. अक्षरा महेश बदने हिने ९८% गुण मिळवत फाउंडेशन स्कूल या शाळेत प्रथम येऊन घवघवीत यश संपादन केले आहे. अक्षराच्या या उल्लेखनी यशाबद्दल सर्व क्षेत्रातून तिचे खूप कौतुक होत आहे. ती लहानपणापासून अभ्यासात अत्यंत हुशार असून तिने विविध स्पर्धा



परीक्षांमध्ये उल्लेखनी कामगिरी केली आहे . तिच्या यशामागे तिची चिकाटी, मेहेनत,पालकाचे मार्गदर्शन व शिक्षकांचे मार्गदर्शन यांचे मोलाचे योगदान असण्याचे सांगण्यात येते. कु.अक्षरा हिला सर्व स्तरातून अभिनंदन करत तिच्या उज्जल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. ***

## ९५.८०% गुण घेऊन आकांक्षा दुबे हिचे यश

परळी वैजनाथ, (बातमीदार):- फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत परळी वैजनाथ येथील फाउंडेशन स्कूलची विद्यार्थिनी कु.आकांक्षा अमर दुबे हिने ९५.८०% गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे.



आकांक्षाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून तिचे कौतुक होत आहे. ती लहानपणापासूनच अभ्यासात अत्यंत हुशार असून तिने विविध स्पर्धा परीक्षांमध्येही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. फाउंडेशन स्कूलचे प्राचार्य व सर्व शिक्षकवृंदांनी आकांक्षाचे अभिनंदन करत तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.**

**खरय..**
**पण...**



**लाकडाचे किडे पूर्ण खुर्ची खाऊन टाकतात पण...**
**खुर्चीचे किडे पूर्ण देश खाऊन टाकतात...!**

# दामिनी अलर्ट.... पुढे धोका आहे..!

**आपत्तीचा पावसाळा**
**लेख-२ (वीज)**

पाऊस आणि आकाशातील वीज याबाबत जाणून घेताना नव्या युगातील नव्या तंत्राच्या वापरातून आपला पावसाळा अधिक सुरक्षित आणि जीवन अधिक सुकर करण्याबाबतही आपण माहिती घेतली पाहिजे. आपण स्मार्टफोनचा वापर करण्यास आपण चांगल्यापैकी सरसावलो आहोत त्यामुळे त्याच्या विविध अप्लिकेशनच्या माध्यमातून आपण उत्तम असे सुरक्षा चक्र तयार करू शकतो.

दामिनी मराठी शब्दकोषात आपण नजर टाकली तर मराठीतच विजेला कितीतरी शब्द आपणास सापडतील.

विजेला सर्वात अधिक परिचित असणारा आपला शब्द म्हणजे विद्युल्लता होय, याला आणखी नावे म्हणजे चपला, (गतीमुळे), चंचला (अस्थिर वृत्तीमुळे), दामिनी, सौदामिनी, बिजोरी तसेच क्षणप्रभा (अल्प चमक)

आता कितीही शब्द याचे वर्णन करता येईल आणि त्याने होणारा अर्थ विविध प्रकारे त्याची तीव्रता स्पष्ट करणारा आहे. भारत सरकारच्या पृथ्वी विज्ञान (Earth Science) मंत्रालयाने हे ॲप सर्वांसाठी विकसित केले आहे. भारत हा उष्णकटिबंधातील




देश असल्याने येथे ७० टक्के वीज पडण्याची नोंद आहे. यामुळेच यातून प्राणहानी टाळण्यासाठी हे ॲप्लीकेशन विकसित केले आहे.

आपण जिथे आहोत त्या जागेच्या ४० किलोमीटर परीघ क्षेत्रात कोणकोणत्या ठिकाणी आकाशात वीज तयार झाली आहे, याची नकाशासह माहिती देण्यासोबत पुढील २५ मिनिटांमध्ये साधारण ७ मिनिटे, २४ मिनिटे आणि २१ मिनिटांनी वीज कोसळण्याची शक्यता असलेले ठिकाण यावर आपणास दिसते. ही माहिती उपग्रहाच्या मदतीने सातत्याने अद्यावत (णविरींश ) अपडेट होत असते.

याचा वापर प्रत्येक व्यक्तीने केल्यास वीज कोसळून होणारे मृत्यू कमी होण्यास मदत होणार आहे.

अँड्रॉइड फोन धारकांसाठी हे ॲप गुगल प्ले स्टोअर वर नि:शुल्क उपलब्ध आहे. या ॲप साठी देशात ८३ ठिकाणी लाइटनिंग लोकेशन नेटवर्क उभारण्यात आले आहे. याचा प्रोसेसर IITM (पुणे) या संस्थेत आहे. या ८३ ठिकाणावरून येणाऱ्या माहितीचे विश्लेषण व त्यावर प्रक्रिया करून ५०० मीटर इतक्या अचूक अंतरात संभाव्य वीज कोसळण्यात ठिकाण ओळखून ते यावर दाखवले जाते.

व्यक्ती आपल्या जीपीएस लोकेशनच्या आधारे आपल्या ठिकाणापासून २० ते ४० किलोमीटर परिघात वीज पडणार की नाही याची माहिती प्राप्त करू शकतो.

Damini Lightning Alert हे आपण डाऊनलोड करून मोबाईल इन्स्टॉल करावे यासाठी शुल्क नाही. कुणालाही हे वापरता येते. ज्यांना यात स्वतःची नोंदणी करायची आहे त्यांना ती Ragister पर्यायावर जाऊन नाव, मोबाईल क्रमांक, पिन कोड तसेच व्यवसाय ही माहिती देवून नोंद करता येते. सध्या देशातील १० लाखावर अधिक जण हे वापरत आहेत. स्वतःवर आणि स्वतःच्या कुटुंबावर प्रेम करणारा प्रत्येक व्यक्तीने हे आप वापरल्यास विजेमुळे होणारी प्राणहानी आपण रोखू शकतो.

**हवामान अंदाज**-भारतीय हवामान खाते आपल्या X (पूर्वीचे ट्विटर) आणि इतर सोशल नेटवर्क देखील २४ तासांपासून पुढील ५ दिवसापर्यंत हवामानाचा अंदाज देते. याची माहिती वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रे तसेच रेडिओवर देखील वेळोवेळी देण्यात येत असते.

गंभीर (रेड), टाळू नका (ऑरेंज), लक्ष ठेवा (येलो), असे विविध रंगी अलर्ट तापमान व पर्जन्यमानाबाबत सातत्याने दिले जातात. त्याकडे आपण देखील तितक्याच गांभीर्याने बघितले पाहिजे.

पाश्चिमात्य देशात घरातून बाहेर पडण्यापूर्वी प्रत्येक व्यक्ती हवामानाचा अंदाज बघून बाहेर पडते आणि घराबाहेर असेपर्यंत त्याबाबत जारी होणाऱ्या अद्यावत सूचनावर लक्ष ठेवून असते. भारतीय- पाक तणावात ब्लॅक आऊट कसा असतो हे बघायला बाहेर पडणारे आपले युवक त्याचेही फोटो काढत रस्त्यावर गर्दी करून होते हे ताजे दृश्य आपण बघितले आहे. यापूर्वी कोरोना काळात लॉकडाऊन मध्ये संचारबंदी कशी असते असे बघणारे आणि पोलिसी पाहुणचार व दंडुक्याचा प्रसाद घेणारे विसरलेलो नाही. मुळात आपण गंभीर असणे आवश्यक आहे. कारण.

***ये जिंदगी का ये***
***जिंदगी ना मिलेगी दोबारा***

करताय मग ॲप डाऊनलोड.

**– प्रशांत विजया अनंत दैठणकर**
जिल्हा माहिती अधिकारी, बीड

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...

न्यू सुधांशू प्रिंटर्स
सुधांशू प्रकाशन अँण्ड ॲडव्हरटाझींग





विद्यार्थी हजेरी
शिक्षक हजेरी
प्रवेश अर्ज
परीक्षा रजिस्टर
यांसह विविध शालेय साहित्य मिळेल.
मजबूत बायडींग | आकर्षक छपाई | वाजवी किंमत
कापडी पिशव्या छापून मिळतील.

'ईश्वर' निवास, श्रीनाथ चित्र मंदिर मागे, शिवाजीनगर,परळी वैजनाथ. जि.बीड 9881244075, Mob.9422328493